प्रेस नोट ता. २७/०८/२०२४

# महीलांचे मंगळसुत्रांची जबरी चोरी करणारा सराईत इराणी जेरबंद

## सोन्याचे १२ तोळे दागीने हस्तगत- ०८ गुन्हे उघड

### गुन्हे शाखा युनिट २ ची उल्लेखनिय कामगिरी

**पिंपरी चिंचवड-** मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये महीलांच्या गळयातील सोन्याचे दागीने हिसडा मारुन चोरणारे गुन्हेगारांना जेरबंद करणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले होते.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे अधिपत्याखालील गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार सातत्याने चैनचोरी करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर पाळत ठेवून तसेच घडलेल्या गुन्हयांचा बारकाईने अभ्यास करुन गुन्हेगारांचा शोध घेत होते. सोनसाखळी चोरीचे गुन्हे करणारे गुन्हेगार निर्जनस्थळावरुन पायी चालत जाणा-या महीला, वृध्द यांची रेखी करुन, तोंडाला मास्क लावुन, हेल्मेट घालुन, मोटर सायकला बनावट नंबर प्लेट किंवा विना नंबर प्लेटच्या वाहनाचा वापर करुन धुम स्टाईलने मोटर सायकल चालवित येवून महीलांचे गळयातील दागीने जबरदस्तीने हिसडा मारुन चोरुन सुसाट वेगाने पळुन जात होते. चैनचोरी गुन्हे घडलेल्या गुन्हयांचे घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची सातत्याने पाहणी केली असता रेकॉर्डवरील सराईत इराणी गुन्हेगारांचा सहभाग असल्याचे दिसुन आले. गुन्हे शाखा युनिट २ चे श्रेणी पोलीस उप निरीक्षक शिवानंद स्वामी यांना त्यांचे गोपनिय बातमीदारांकरवी माहीती मिळाली कि, चैनचोरीचे गुन्हे करणारे इराणी गुन्हेगार निगडी परिसरामध्ये मोटर सायकलवरुन संशयितरित्या फिरत आहेत.

गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी निगडी पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुध्न माळी, पोलीस निरीक्षक गुन्हे निलेश वाघमारे, यांना माहीती देवून गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस उप निरीक्षक केराप्पा माने, शिवानंद स्वामी, दिपक खरात, महीला पोलीस हवालदार उषा दळे, पोलीस अंमलदार अजित सानप, शिवाजी मुंढे, उध्दव खेडकर तसेच निगडी पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक महादेव यलमार, पोलीस हवालदार नागरगोजे यांचे पथक तयार करुन सदर पथकाला सुचना व मार्गदर्शन करुन तात्काळ माहीतीची खातरजमा करणेसाठी पाठविले. सदर तपास पथकाने निगडी परिसरात बातमीप्रमाणे शोध घेवून ट्रान्सपोर्टनगर परिसरात सापळा लावुन मोटर सायकलवरुन संशयितरित्या फिरणारा संशयित इसम नामे १) सादीक शमल खान इराणी वय ३४ वर्षे धंदा- ऑप्टीकल रा. वॉर्ड नंबर १, न्यु कोर्ट जवळ श्रीरामपुर ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर व महीला नामे २) नर्गीस जाफर इराणी वय ४५ वर्षे रा. विष्णूकृपानगर इराणी वस्ती शिवाजीनगर पुणे यांना शिताफीने ताब्यात घेतले. सादीक शमलखान इराणी याचे ताब्यातील मोटर सायकल चोरीची असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना विश्वासात घेवून अत्यंत कौशल्यपुर्ण तपास केला. सादीक शमल खान इराणी हा

रेकॉर्डवरील सराईत इराणी गुन्हेगार असुन त्याचेवर चैनचोरी, बतावणी करुन फसवणुक व इतर असे एकूण सुमारे १९ गुन्हे दाखल आहेत. सादीक शमलखान इराणी याने त्याचे साथीदारासह मिळुन वेळोवेळी वेगवेगळया चोरीचे वाहनांचा वापर करुन पिंपरी चिंचवड शहर परिसरातुन महीलांचे गळयातील सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीत यांचेकडून १२ तोळे वजनाचे, सुमार ९ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले असुन खालील नमुद गुन्हे उघडकीस आले आहेत.

उघडकीस आलेले गुन्हे -

१) निगडी पोस्टे गुन्हा रजि. नंबर ०९/२०२४ भा.दं.वि.कलम - ३९२,३४

२) निगडी पोस्टे गुन्हा रजि. नंबर १२७/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४

३) निगडी पोस्टे गुन्हा रजि. नंबर २२७/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३४

४) चिंचवड पोस्टे गुन्हा रजि. नंबर २४५/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४

५) चिखली पोस्टे गुन्हा रजि. नंबर १२/२०२४ भा.द.वि कलम ३९२

६) एमआयडीसी भोसरी पोस्टे गुन्हा रजि. नंबर २६६/२०२४ भा.द.वि कलम ३९२, ३४

७) चाकण पोस्टे गुन्हा रजि. नंबर ४२६/२०२४ भादवि कलम ३९२

८) स्वारगेट पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर १०६/२०२४ भादवि कलम ३७९

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री शशिकांत महावरकर , अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, निगडी पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुध्न माळी, पोलीस निरीक्षक गुन्हे निलेश वाघमारे, पोलीस उप निरीक्षक महादेव यलमार, पोलीस हवालदार नागरगोजे , युनिट २ चे पोलीस उप निरीक्षक केराप्पा माने, शिवानंद स्वामी, दिपक खरात, दिलीप चौधरी, महीला पोलीस हवालदार उषा दळे, पोलीस अंमलदार अजित सानप, शिवाजी मुंढे, उध्दव खेडकर यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड